**MHAH070002882006**

नियमित दिवाणी अपील क्र.७४/२००६
निशाणी ४२ चा आदेश

१. अपीलार्थी क्र.३ कारभारी अनाजी मेमाणे मयत झालेने त्यांचे वारस अभिलेखावर आणणेसाठी अर्ज निशाणी ४२ अपीलार्थींनी दाखल केला आहे.

२. अपीलार्थींचे असे कथन आहे की, अपीलार्थी क्र.३ कारभारी यांचा मृत्यू दिनांक ०६.०९.२०२१ रोजी झाला. त्यांचे कायदेशीर वारस मुदतीत रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते. सदरचे अपील हे स्थावर मिळकतीचे वादासंबंधाने असल्याने मयत अपीलार्थी क्र.३ चे वारस अपीलास आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे त्यांना वारस म्हणून अभिलेखावर घेणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. सदर वारसांपैकी वारस क्र.१ राजेंद्र कारभारी मेमाणे अर्ज देतांना उपस्थित असल्याने व इतर वारस अर्ज देतांना उपस्थित नसल्याने अपीलात वारस क्र.१ यास अपीलार्थी म्हणून व उर्वरित वारसांना उत्तरार्थी क्र.१३ ते १९ म्हणून अभिलेखावर घेणेत यावे.

३. अर्ज निशाणी ४२ साठी उत्तरार्थींनी अर्जावरच म्हणणे दिले की, उत्तरार्थीचे कथन की, अर्ज मुदतीत दाखल नाही. अर्जासोबत उशीर माफीचा अर्ज देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक होते. अपीलार्थीने जाणूनबुजून अर्ज दाखल करण्यास उशीर केलेला आहे. त्यामुळे सदर अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

४. दोन्ही बाजूंचे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. निशाणी ४७ चे यादीसोबतचे मुळ मृत्यु प्रमाणपत्र वाचले असता असे निदर्शनास येते की, अपीलार्थी क्र.३ कारभारी अनाजी मेमाणे यांचा मृत्यू दिनांक ०६.०९.२०२१ रोजी झाला. मयत अपीलार्थी क्र.३ चे वारसांतर्फे अपील चालविण्याचा अपीलार्थींचे वारसांचा अधिकार अपीलार्थी क्र.३ कारभारी अनाजी मेमाणे यांच्या मृत्युनंतर अबाधित आहे. (right to sue survives to the heirs of

appellant). दिवाणी व्यवहार संहिता क्रम २२ नियम ३(१) चे तरतुदीनुसार अपीलार्थी क्र.३ कारभारी यांचे वारस अपीलार्थी क्र. ३अ राजेंद्र कारभारी मेमाणे व उर्वरित वारसांना उत्तरार्थी क्र.१४ ते १९ म्हणून अपीलात सामील करणे आवश्यक आहे.

६. अपीलार्थीचे वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज कारभारी यांचे मृत्युपासून ९० दिवसांचे कालावधीत देणे कालमर्यादा अधिनियमाचे अनुच्छेद क्र.१२० चे तरतुदीनुसार आवश्यक आहे. (Article 120 of the Limitation Act 1963). कारभारीचा मृत्यु दिनांक ०६.०९.२०२१ पासून ९० दिवसांत म्हणजेच दिनांक ०६.१२.२०२१ पर्यंत वारस अभिलेखावर आणणे जरुरीचे आहे. ०६.१२.२०२१ रोजी वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज अपीलार्थीने दिला आहे. त्यामुळे अर्ज नि.४२ मुदतीत दाखल केला आहे.

७. अपीलाचा न्यायनिर्णय गुणदोषावर होणेसाठी अपीलार्थी क्र.३ चे वारस अपीलार्थी क्र.३अ व उर्वरित वारसांना उत्तरार्थी क्र.१४ ते १९ यांना उत्तरार्थी म्हणून अभिलेखावर घेवून त्यांना अपील चालविण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायतत्वाने आवश्यक आहे. त्यामुळे अपीलार्थी क्र.३ चे वारसांना अभिलेखावर घेणेचा अर्ज नि. ४२ मान्य करणे न्यायोचित ठरेल. सबब आदेश.

## <u>आदेश</u>

अपीलार्थींचा अपीलार्थी क्र.३ च्या वारसांना अभिलेखावर घेणेसाठीचा अर्ज नि.४२ मान्य केला आहे.

MANDAR RAMCHANDRA NERLEKAR

Digitally signed by MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Date: 2025.10.04 16:07:05 +0530

संगमनेर ( मंदार नेरलेकर )

दिनांक – ०४/१०/२०२५ जिल्हा न्यायाधीश क्र. २

संगमनेर